अशा प्रकारे राजकिय विचारप्रणालीचे स्वरूप थोडक्यात सांगता येईल.

## * राजकिय विचारप्रणालीची भूमिका (Role of Political Ideology)

### १) शांतता प्रस्थापित करणे -

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यामध्ये विचारप्रणालीची भूमिक महत्त्वाची ठरते. गांधीवादी उदारमतवादी, लोकशाही समाजवाद इत्यादी विचारप्रणाली हिंसा, रक्तपाताएवजी अहिंसा, शांतता, सहकार्याच्या मार्गाने समर्थन करतात. परंतु फॅसिस्ट सारख्या काही विचारप्रणाली शांततेच्या तत्वाला विरोध करत असल्या तरी बहुतांश विचारप्रणाली शांततेचा मार्ग अवलंबून आपले हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करत असतात.

### २) राजकिय जागृती निर्माण करणे -

जनतेमध्ये राजकिय जागृती निर्माण करण्याचे कार्य राजकीय - विचारप्रणालीद्वारे होते. कोणती राजकीय व्यवस्था चांगली व कोणती वाईट आहे. याचे आकलन लोकांना होते, राजकारणाचे ज्ञान मिळते. राजकीय विचारप्रणालीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी धडे मिळतात.

### ३) जनतेच्या समस्या दूर करणे -

जनतेसमोर अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय समस्या, प्रश्न निर्माण झाले आहेत. ते दूर करण्यासाठी व्यक्तींना विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे.

कामगार वर्गासमोरील अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी साम्यवादी विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे.

4> संघटन, एकता निर्माण करणे -

एखाद्या विशिष्ट उद्देशावर आधारित विचारप्रणाली द्वारे जनतेमध्ये, विविध देशामध्ये एकात्मता निर्माण होते. एकाच विचारप्रणालीचा स्वीकार करणाऱ्या देशामध्ये एकात्मता निर्माण करणे अवघड जात नाही. शीत युद्धाच्या कालखंडामध्ये साम्यवादी राष्ट्रामध्ये व भांडवलशाही राष्ट्रामध्ये एकात्मता दिसून येते.

5> परिवर्तन घडवून आणणे -

विचारप्रणालीद्वारे सामाजिक व राजकीय परिवर्तन घडवून आणले जाते. मार्क्सवाद, साम्यवाद, समाजवाद इत्यादी विचारप्रणालीद्वारे सामाजिक, आर्थिक, राजकिय व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवले जाते.

6> वैचारिक मार्गदर्शन करणे -

विचारप्रणालीमुळे लोकांना वैचारिक मार्गदर्शन मिळते. संघर्षाला, शांततेला, मित्रत्वाला, सहकार्याला वैचारिक साधने उपलब्ध होतात. जनतेला वैचारिक मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्यांच्या राजकिय ज्ञानामध्ये भर पडते. यामुळे या विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे.

7> आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करणे -

राष्ट्रीय

राजकारणाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय राजकारणातही राजकिय विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे. परराष्ट्र धोरणाच्या निर्धारिक घटकामध्ये विचारप्रणाली हा घटक अत्यंत प्रभावी असतो. एकाच विचारप्रणालीचा स्वीकार करणाऱ्या दोन राष्ट्रामध्ये शक्यतो मित्रत्व सहकार्यांचे संबंध दिसून येतात.

## 8) राष्ट्रीय हितामध्ये महत्त्वाची भूमिका -

राजकिय विचारप्रणाली राष्ट्रीय हितामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्रीय हिताचा आधार म्हणून राजकिय विचारप्रणालीकडे बघितले जाते. एवढेच नसून विचारप्रणालीचा राष्ट्रीय हिताच्या निर्धारणावर विचारप्रणालीच्या प्रभाव दिसून येतो. राजकिय विचारप्रणालीच्या आधाराशिवाय राष्ट्रहिताची संकल्पना साध्य करता येत नाही. जागतिक राजकारणात राष्ट्रहिताच्या प्राप्तीसाठी विचारप्रणाली महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते.

## 9) राष्ट्रीय शक्तीमध्ये वाढ करणे -

राष्ट्रीय शक्ती (power) निर्माण करण्यामध्येही राजकीय विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे. फॅसिस्ट विचारसरणी व्यक्तिंना देशासाठी सर्वस्वाचे समर्पण करण्याची, त्यागाची, बलिदानाची शिकवन देवून परिश्रमास महत्त्व देते. समान विचार सरणीचा स्विकार केलेल्या राज्यामध्ये परस्पर विश्वास व सहकार्याची भावना वाढीस लागते. त्या सहकार्याने राष्ट्रशक्ती वाढते तसेच राष्ट्रवाद ही विचारसरणी लोकामध्ये राष्ट्राप्रती, स्नेह आपुलकी समर्पणाची भावना निर्माण करते या भावना राष्ट्रशक्तीसाठी पोषक ठरतात.

Scanned with CamScanner

## १०) राजकिय सत्ता प्राप्त करणे -

राजकिय सत्ता प्राप्त करण्यासाठी, मिळवलेली सत्ता टिकविण्यासाठी विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची असते. राजकिय पक्ष कोणत्या विचारप्रणालीचा आधार घेवून सत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करतो. भारतामध्ये भारतीय जनता पक्षांनी हिंदुत्ववादाच्या आधार घेवून सत्ता प्राप्त केली आहे.

## ११) इतर घटक -

राजकिय विचारप्रणालीच्या वरील भूमिकेप्रमाणे इतर अनेक ठिकाणीही महत्त्वाची भूमिका आहे.

1. विचारप्रणालीद्वारे समाजात विशिष्ट राजकिय सामाजिक, धार्मिक, आर्थिक भावना रुजविता येतात. या भावनेतूनच राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य निर्माण होते.
2. विचार प्रणालीतून राज्याला राष्ट्रीय, आर्थिक, राजकीय स्थैर्य प्रस्थापित करता येते.
3. मानवी जीवनाला अर्थ प्राप्त होते.
4. संपूर्ण जगाचे आकलन होते.

अशा प्रकारे राजकारणामध्ये विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे. तिच्या या भूमिकेमुळेच विचारप्रणालीचे अस्तित्व नाकारता येत नाही. दिवसेंदिवस विचारप्रणालीची गरज भासत आहे. संपूर्ण मानवी जीवनच विचारप्रणालीने व्यापून टाकले आहे.

Scanned with CamScanner